दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २५४ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शुक्रवार, दि.१२ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## मुंबईसह राज्यभर तापमानात लक्षणीय घट

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात थंडीचे प्रमाण वाढले आहे. मुंबईतही अशीच परिस्थिती आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस तापमानातील घट कायम राहणार असल्याचा अंदाज वर्तविला होता. त्यानुसार मुंबईसह संपूर्ण राज्यात गुरुवारी तापमानात आणखी घट झाली. हवामान विभागाच्या सांताक्रूझ केंद्रात गुरुवारी १५.६ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदले गेले. याआधी नोव्हेंबर महिन्यात १५.७ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली होती. सध्या संपूर्ण राज्यात तापमानाच्या पाऱ्यात घसरण झाली आहे. अनेक भागात सरासरीपेक्षा कमी किमान तापमानाची नोंद झाली आहे. तर काही भागात सरासरी इतक्या तापमानाची नोंद झाली . मुंबईतही गेले काही दिवस थंडीचे प्रमाण वाढले आहे. किमान तापमानातील घट कायम आहे. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात गुरुवारी २०.९ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ केंद्रात १५.६ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. तापमानात आणखी घट झाल्यामुळे काहीसा दिलासा मिळाला.

# पंचशील नगर झोपडपट्टीला भयंकर आग ; अनेक झोपड्या जळून खाक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल पूर्वेकडील पंचशील नगर झोपडपट्टी परिसरात हाय टेन्शन इलेक्ट्रिसिटीची वायर तुटल्याने अचानक भीषण आग लागली. आज दुपारच्या सुमारास झालेल्या या घटनेमुळे परिसरात काही मिनिटांतच गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. आग वेगाने पसरत असल्याने अनेक झोपड्या जळून खाक झाल्या असून नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.



आगीची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस, वाहतूक शाखा, महावितरण अधिकारी आणि अग्निशामक दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाने तत्काळ पाण्याचे फवारे मारत आग नियंत्रणात आणण्यास सुरुवात केली. गॅस सिलेंडर आणि इतर ज्वलनशील पदार्थांच्या उपस्थितीमुळे आग अधिक धोकादायक बनण्याची शक्यता होती. अग्निशामक कर्मचारी सतर्क राहून आगीवर नियंत्रण मिळविण्यास यशस्वी ठरले. गंभीर बाब म्हणजे विचुंबे गाढी नदी पूल, पोदी स्मशानभूमी, विसपुते कॉलेज, सेक्टर १५, पंचशील नगर, श्रीयश हॉस्पिटल ते नवीन पनवेल ब्रिजपर्यंत तब्बल तीन किलोमीटर हाय टेन्शन वायर लोंबकळत असल्याचे समोर आले. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक चालत असल्याने नागरिकांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.घटना पनवेल रेल्वे स्टेशनच्या पूर्वेकडील पार्किंग आणि रिक्षा स्टँड परिसरात घडली. यात पार्किंगमध्ये ठेवण्यात आलेल्या दुचाकींचे सुद्धा मोठे नुकसान झाले आहे.

बिकानेर स्वीट्स समोरील हाय टेन्शन टॉवरवरून वायर तुटली आणि झोपड्यांवर कोसळताच आग लागली असल्याचे प्रत्यक्षदर्शीने सांगितले आहे धुराचे प्रचंड झोत वरपर्यंत उठल्याने स्टेशन परिसरातील प्रवासी आणि स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली. ही दुर्घटना शाळा भरण्याच्या आणि सुटण्याच्या महत्त्वाच्या वेळेत घडल्याने शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेबद्दल पालकांमध्ये भीती निर्माण झाली.रिक्षा वाहतूक व स्कूल बस काही काळ विस्कळीत झाल्या तर स्टेशन परिसरातही प्रवाशांची गर्दी वाढली आणि वाहतुकीत अडथळे निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेचे माजी सभापती ॲड. मनोज भुजबळ, पनवेल नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष संदीप पाटील आणि टीआयपीएलचे जगदीश घरत घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी नागरिकांची विचारपूस करत प्रशासनाला मदतकार्य गतीमान करण्याचे निर्देश दिले.

### रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयात करोडोचा अपहार

## पोलीस पाटलांची बनावट नावे टाकून बिल काढण्याचा प्रताप; चौघांविरोधात गुन्हा

**दै.रायगड नगरी । रत्नाकर पाटील**

**अलिबाग ।** पोलीस पाटील यांची बनावट नावे टाकून मानधनाच्या बिलात फेरफार करण्याचा प्रताप समोर आला आहे. यामध्ये पावणे दोन कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयातील लेखा शाखेतील कनिष्ठ लिपिकांसह चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




रायगड जिल्हा परिषदेतील करोडो रुपयांच्या भ्रष्टाचारानंतर आता पोलीस अधीक्षक कार्यालयातील लेखा विभागातील लिपिकाकडून भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी राजेश राम जाधव हे पोलीस अधीक्षक कार्यालयातील लेखा शाखा विभागात कनिष्ठ लिपीक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी २०२१ पासून ते आजतागायत जिल्ह्यातील पोलीस पाटील यांची यादी बनवून त्यामध्ये प्रत्यक्ष हजर नसलेल्या पोलीस पाटलांची बनावट नावे टाकून बनावट देयक तयार केले. त्यानंतर पोलीस पाटील यांची दरमहा मानधनाची मंजुरी कोषागारातून प्राप्त करून घेतली. त्यानंतर पुन्हा या यादीमध्ये फेरफार करून दुसरी बनावट यादी तयार करून स्वतःच्या नावे ७२ लाख ३२ हजार ५०० रुपये, तसेच रिया राजेश जाधव या पोलीस पाटील नसताना त्यांच्या नावाचा मुदतवाढीचा खोटा दाखला बनवून त्यांच्या नावाने एक कोटी पाच लाख ९६ हजार रुपयांची रक्कम कोषागारातून काढली. एकूण एक कोटी ७८ लाख २९ हजार ३०० रुपयांचा अपहार करण्यात आल्याचे उघड झाले आहे

स्वतःच्या व इतर अशासकीय व्यक्तींच्या बँक खात्यात घेऊन शासकीय रकमेचा स्वतःच्या फायद्यासाठी अपहार केला. इतर काही पोलीस पाटील यांच्या नावे दुबारपेक्षा अधिक वेळा त्यांच्या खात्यावर मानधनाची रक्कम टाकण्यात आली आहे. याप्रकरणी राजेश जाधव, रिया जाधव व इतर दोन अशा एकूण चौघांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जासई-उरण ग्रामस्थांचा यशस्वी लढा...

# मुंबई हायकोर्टाने जमीन संपादन कारवाई केली रद्द

**दै.रायगड नगरी । मुंबई**

जासई-उरण गावातील सर्व ग्रामस्थांना मोठा दिलासा देणारा ऐतिहासिक निर्णय मुंबई हायकोर्टाने दिला आहे. नवी मुंबई प्रकल्पासाठी सिडकोनी अधिसूचित केलेल्या ९५ गावांपैकी जासई-उरण गावाची जमीन संपादन प्रक्रिया शून्य व अमान्य असल्याचे हायकोर्टाने घोषित केले आहे. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेला हा निर्णय नवी मुंबईतील जासई-उरण ग्रामस्थांसाठी अत्यंत महत्वाचा विजय ठरला आहे. ज्या ग्रामस्थांच्या संपादन केलेल्या जमिनीवर गेली काही वर्षे अवैधपणे हस्तक्षेप करत होती, त्यांना या निर्णयामुळे दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्र शासनाने २०२१ मध्ये नवी मुंबई प्रकल्पासाठी संपूर्ण जासई-गाव अधिग्रहित करण्याचा अधिसूचना काढली होती. या अधिसूचनेचा परिणाम गावातील सर्व कुटुंबांवर झाला. प्रशासनाने कोणतेही प्रत्यक्ष संपादन न करता किंवा त्याबदल्यात नुकसान भरपाई न देता महसूल अभिलेख व ७/१२ उताऱ्यांत बेकायदेशीररीत्या स्वतःचे नाव नोंदवून घेतल्याचे समोर आले. त्यानंतर घरांसह इतर बांधकामांवर तोडक कारवाईच्या नोटिसा जारी करण्यात आल्या आणि ग्रामस्थांना प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागला. या अन्यायाविरोधात जमीन मालक शशिकला भोलनाथ पाटील, गोगरी परिवार आणि एन. जी. ठाकूर यांनी एकत्र येऊन न्यायालयाची दारे ठोठावली. त्यांच्या वतीने ॲड. संकेत दिपक ठाकूर (पनवेल) यांनी मुंबई हायकोर्टात रिट याचिका दाखल करून संपादन प्रक्रिया व महसूल अभिलेखातील बेकायदेशीर नोंदी रद्द करण्याची मागणी केली. त्यांनी माननीय कोर्टाच्या निदर्शनास आणले की ही सर्व कारवाई कायद्याने अपेक्षित प्रक्रिया पूर्ण न करता केली आहे तसेच मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारी आहे.



न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या बाजूने ठाम भूमिका घेत संपूर्ण जमीन संपादन प्रक्रिया लॅप्स झालेली असल्याचे नमूद केले व ती पूर्णतः रद्द करण्याचे आदेश दिले. तसेच महसूल अभिलेखात प्रशासनाच्या नावाने करण्यात आलेल्या सर्व बेकायदेशीर नोंदी तातडीने रद्द करण्याचेही आदेश दिले. भविष्यात कोणतीही संपादन प्रक्रिया करताना कायद्याने अपेक्षित सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचेही न्यायालयाने आदेश दिले आहेत. हा निर्णय ग्रामस्थांसाठी न्याय पुनःस्थापित करणारा असून सार्वजनिक जमीन व्यवहारांमध्ये जबाबदारी निश्चित करणारा मार्गदर्शक निर्णय आहे, असे एका विधिज्ञ विश्लेषकाने नमूद केले. या विजयाचे श्रेय जमिनीच्या हक्कांसाठी लढणाऱ्या शशिकला भोलनाथ पाटील तसेच ॲड. संकेत दिपक ठाकूर यांच्या विधी कौशल्यामुळे शक्य झाले आहे.

जासई-उरण हे प्रामुख्याने मत्स्य व शेतीप्रधान गाव. या निर्णयामुळे ग्रामस्थांचे जीवन, घरे व उपजीविका सुरक्षित राहणार असल्याने संपूर्ण गावात आनंद व समाधानाचे वातावरण आहे. जासई ग्रामस्थांकडून दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी ॲड. संकेत ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला. नवी मुंबईचा विस्तार झपाट्याने वाढत असला तरी हा खटला विकास आणि स्थानिकांचे हक्क यामधील संघर्ष अधोरेखित करतो आणि प्रशासनाने न्याय्य व कायदेशीर पद्धत अवलंबणे किती आवश्यक आहे, हे पुन्हा अधोरेखित करतो.

## महावितरणचे २२८५ कंत्राटी कामगार कायम करा, हायकोर्टाचे आदेश

**दै.रायगड नगरी । विठ्ठल ममताबादे**

**उरण ।** महावितरण मधील वीज कंत्राटी कामगारांना कायम करावे या मागणी साठी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघाने २०१२ साली मा.मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत ५६५६/२०१२ ही याचिका दाखल केली होती. मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाने हे प्रकरण मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे वर्ग करण्यात आले. एकूण २२८५ कामगार यात असून सातत्यपूर्ण १३ वर्षांच्या कायदेशीर लढ्यानंतर १७ जून रोजी मा.न्यायाधीश एस.झेड.सोनभद्रे यांनी ऐतिहासिक अवॉर्ड जाहीर केला होता.

सदरील मा.कोर्टाचा अवॉर्ड ( निकाल ) बुधवार दि.१० डिसेंबर रोजी ल.य.भुजबळ, कामगार उपायुक्त महाराष्ट्र शासन (औद्योगिक विवाद) यांनी अधिकृतरीत्या संघटनेला दिला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगाळे, उपसरचिटणीस राहुल बोडके, संघटन सचिव उमेश आणेराव व कोषाध्यक्ष सागर पवार हे कामगार आयुक्त कार्यालय मुंबई येथे उपस्थित होते.

या निकालामुळे कंत्राटीकरणाच्या चुकीच्या प्रवृत्तीवर प्रभावी नियंत्रण येणार असून कंत्राटदार व मुख्य नियोक्ता या दोघांनाही जबाबदार धरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकरणात कामगारांकडून १० तर व्यवस्थापनाकडून २ साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. या दीर्घ लढ्यात संघटनेच्या वतीने मुंबईचे ज्येष्ठ अँड. विजय पांडुरंग वैद्य,अँड.बाळासाहेब देसाई आणि अँड.शिरीष राणे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. व्यवस्थापनाकडून अँड.एल.आर.मोहिते यांनी बाजू पाहिली.

## उरण शहरात राजपाल नाका येथे घराला आग

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण ।** उरण शहरातील राजपाल नाका येथे आज दुपारी ४:१५ च्या सुमारास गुलजार भाटकर यांच्या घरास अचानक पणे आग लागली. आग कशामुळे लागली याचे नेमकी कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. सुदैवाने यात कोणतेही जीवितहानी झाली नाही.अशी माहिती उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलांनी यांनी दिली. या आगीवर सिडको अग्नीशमन यंत्रणाच्या फायर ब्रिगेडने नियंत्रण मिळवले असून सिडको अग्निशमन यंत्रणेचे अधिकारी कर्मचारी यांनी घटना स्थळी युद्ध जन्य परिस्थितीत आगीवर नियंत्रण मिळविले.



सिडको अग्निशमन यंत्रणा व पोलीस प्रशासन व रिक्षा चालकांच्या सावधानतेमुळे अनुचित प्रकार टळला आहे. आग लागलेल्या घरात एकूण ३ मुली होत्या.

आग लागल्याचे लक्षात येताच ३ मुलींनी दुसऱ्या मजल्या वरून खाली उडी मारली.रिक्षा चालकांनी या ३ मुलींचे जीव वाचविले.आग मोठी असल्यामुळे खूप मोठया प्रमाणात धूर सर्वत्र पसरले होते.दुसऱ्या मजल्यावर असलेले गुलजार भाटकर यांचे जुने घर जळून खाक झाले आहे.

तळ मजल्या वर अशोक राजपाल यांचे इलेक्ट्रिक सामानाचे गोडावून होते. त्यात शॉर्ट सर्किट होऊन आग लागल्याचे काही नागरिकांचे म्हणणे आहे. नेमकी आग कशामुळे लागली याचे नेमके कारण समजू शकले नाही. पोलीस प्राथमिक चौकशी करीत आहेत.आगीच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.उरण मध्ये आगीच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असून नागरिकांनी खबरदारी घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

### कोकण रेल्वेच्या रो-रो सेवेला बळकटी...

# ५७ टन वजनी ट्रकची वाहतूक करण्यासाठी दोन वॅगन तयार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

रेल्वे वॅगनवरून मालवाहू ट्रकची वाहतूक करण्यास कोकण रेल्वेची रोल-ऑन रोल-ऑफ (रो-रो) सेवा एक किफायतशीर पर्याय आहे. परंतु, त्यातून ५० टनापेक्षा जास्त वजनाच्या मालवाहू ट्रकची वाहतूक करता येत नव्हती. आता कोकण रेल्वेने ५७ टन वजनाच्या ट्रकची वाहतूक करता येईल अशा वॅगनची निर्मिती करून रो-रो सेवेची वहन क्षमता वाढवण्यात आली आहे. रो-रो वॅगनचा पहिला रेक ५ नोव्हेंबर रोजी धावणार आहे. तर, नुकताच दुसरा वॅगन तयार करून सेवेत दाखल झाला.

कोकण रेल्वेवर मागील २६ वर्षांपासून मालवाहतुकीच्या क्षेत्रात वेगवान मार्ग तयार करणारी 'रोल ऑन रोल ऑफ सेवा' ( रो-रो) सेवा सुरू आहे. देशभरात धान्य, फळे, भाजीपाला, अत्यावश्यक सेवेतील सामग्रीची वाहतूक रो-रो सेवेद्वारे केली जाते.

मालवाहू ट्रक रस्ते मार्गाने धावल्यास, त्यांना वाहतूक कोंडी, इंधन खर्च व इतर अनेक खर्चाला सामोरे जावे लागते. तसेच, प्रचंड वेळखाऊ प्रवास असल्याने, इच्छित ठिकाणी सामग्री अवेळी पोहचण्याची शक्यता असते. यासह रस्ते मार्गाने मालवाहू ट्रकचा अपघात होऊन, अत्यावश्यक सेवा वाया जाऊ शकते. त्यामुळे रो-रो सेवा जीवनावश्यक आणि अत्यावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्यासाठी ही सेवा लाभदायक आहे. रो-रो सेवेच्या वॅगनची क्षमता ५० टन होती. परिणामी, ५० टनांपेक्षा अधिक वजनाचे सामान असलेल्या ट्रकची वाहतूक करता येत नव्हती.



मालवाहतुकदारांसह, कोकण रेल्वेचे देखील यामुळे नुकसान होत होते. आता रो-रो सेवेच्या वॅगनची वहनक्षमता ५० टनावरून ५७ टन करण्यात आली असून त्यामुळे ५७ टनापर्यंत ट्रकची वाहतूक करणे शक्य झाले आहे. असे दोन वॅगन तयार केल्याने मालवाहू ट्रकची वाहतुकीला बळकटी मिळाली आहे. अवजड व्यावसायिक वाहनांची वाहतूक अधिक सुलभ होईल.

वाढलेल्या क्षमतेमुळे कोकण रेल्वेवरून लोह आणि पोलाद, संगमरवरी टाइल्स, बांधकाम साहित्य आणि इतर जड मालवाहतूक करणाऱ्या ट्रकचालकांना आणि उद्योगांना विशेषतः फायदा होईल, अशी माहिती कोकण रेल्वेने दिली. इतर वॅगनसाठी ५० टन कमाल मर्यादा असेल. १५ बीआरएन या वॅगनची कमाल वहनक्षमता ५७ टनापर्यंत आहे. ३५ बीओक्सएन या वॅगनची कमाल वहनक्षमता ५० टनापर्यंत आहे. ५० ते ५७ टनासाठीचे अतिरिक्त शुल्क ८०० रुपये प्रति टनाला लागू असेल. तसेच यासाठी वस्तू आणि सेवा कर आकारण्यात येईल, अशी माहिती कोकण रेल्वेने दिली.

# जमीन विक्रीच्या बहाण्याने मजूर ठेकेदाराला घातला लाखोंचा गंडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमधील त्रिकुटाने चेरवली येथील ६० गुंठे जमीन विक्री करण्याच्या बहाण्याने कोपरखैरणेती रमेश वेटा (६९) या मजूर ठेकेदाराला ९२ लाख ७३ हजारांचा गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. भीमराव राठोड, वासुदेव लाड व बाळाराम लाड अशी त्रिकुटाची नावे असून, पनवेल शहर पोलिसांनी त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

रमेश वेटा यांची नोव्हेंबर २०११ मध्ये भीमराव राठोड याच्याशी ओळख झाली होती. दरम्यान, राठोड याने त्याच्या मालकीची चेरवली येथे ६० गुंठे जमीन असल्याचे सांगून ती प्रती गुंठा १ लाख रुपयांप्रमाणे ६० लाख रुपयांमध्ये विकत घेण्यास सांगितले होते. त्या वेळी राठोड याने खोटे व बनावट सातबारा उतारे दाखवून जमीन त्याच्या नावावर असल्याचे भासवले होते.

त्यामुळे रमेश वेटा यांनी जमीन खरेदीसाठी राठोड याला पैसे देण्यास सुरुवात केली. मार्च २०१२ मध्ये पनवेल येथील दुय्यम निबंधक कार्यालयात या जमीन खरेदी-विक्री व्यवहाराची नोंदणीही करण्यात आली.

एवढेच नव्हेतर राठोड याने २०१२ चे बनावट सातबारा दाखले ही रमेश वेटा यांना सादर केले. त्यामुळे त्यांनी राठोड याला ५३ लाख ८० हजार रुपयांची रक्कम धनादेशद्वारे दिली. मात्र, मे २०१२ मध्ये ही जमीन राठोड यांच्या नावावर नसून त्याचे मूळ मालक वासुदेव आणि बाळाराम विठ्ठल लाड हे दोघे असल्याचे वेटा यांना समजले. त्यानंतर लाड यांनीदेखील त्यांच्या नावे असलेल्या जमीन व्यवहारात अडथळा निर्माण करणार नसल्याचे सांगून वेटा यांच्याकडे २० लाखांची मागणी केली. त्यावर वेटा यांनी दबावाखाली रोख व चेकद्वारे लाड यांना २० लाख रुपये दिले. त्यानंतर या तिघांनी संगनमत करून रमेश वेटा यांच्या नावावर जमीन न करता जून २०१४ मध्ये राठोड यांच्या नावावर करून घेतली. त्यानंतर जमीन किंवा पैसे देण्यास टाळाटाळ करू लागल्याने अखेर वेटा यांनी या तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# माझी वसुंधरांतर्गत पिल्लई महाविद्यालयामध्ये महापालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्व शालेय व महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयामध्ये आज दिनांक १२ डिसेंबर रोजी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजूषा स्पर्धा, शॉर्ट फिल्म प्रसारण व व्याख्यानाचे आयोजन पनवेल महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले.



माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्व शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना समजावे यासाठी महापालिकेच्यावतीने पालिका कार्यक्षेत्रातील माध्यमिक विद्यालये व महाविद्यालयामध्ये उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनूसार विविध स्पर्धा व व्याख्यानाचे आयोजन करण्यात येत आहे. माझी वसुंधरा अभियानांतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्वाच्या घटकांनूसार कृती कार्यक्रम, शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषांचे आयोजन विद्यालयांमध्ये करण्यात येत आहेत.

माझी वसुंधरा अंतर्गत आज पिल्लई महाविद्यालयामध्ये 'कचरा व्यवस्थापन' या बद्दल मार्गदर्शन करण्यात आले.यामध्ये विद्यार्थ्यांना ओला कचरा ,सुका कचरा,वैद्यकिय कचरा, इ कचरा यांचे वर्गीकरण, त्याचे महत्व, ओल्या कचऱ्यातून खत निर्मिती या विषयी माहिती सांगण्यात आली. याबरोबरच पर्यावरण संवर्धनावर आधिरित व्हिडीओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

यावेळी प्राचार्या गजानन वाडेर , प्राध्यापक किरण देशमुख विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच पध्दतीने महापालिकेच्या वतीने विविध शाळांमध्ये कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

# मनसेचे आंदोलन स्थगित, श्वान निर्बीजीकरणाला सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मनसे तालुका उपाध्यक्ष सुजित सोनवणे यांनी पनवेल तालुक्यातील भटक्या श्वानांचा बंदोबस्त करून निर्बीजीकरण करण्याची मागणी केली होती. ते न झाल्याने या विरोधात १२ डिसेंबर रोजी आंदोलन करण्यात येणार होते. मात्र चार आठवड्यांच्या कालावधी दरम्यान श्वान निर्बीजीकरणाला सुरुवात होणार असल्याची माहिती गटविकास अधिकारी, पंचायत समिती पनवेल यांनी दिल्याने मनसेचे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. त्यामुळे मनसेच्या मागणीला यश येणार आहे.


बोराडे-कपूर सो।

ॲड.अविनाश हिं. कदम

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. (व) स्तर यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्रं.१६५६/२०२५

नि.नं.९/ड

ने.ता.१७/०२/२०२६

श्रीमती टी. आर जयलक्ष्मी व इतर २ — अर्जदार

विरूद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीदवारे सर्व जनतेस कळविणेत येत आहे की, वरील अर्जदार १ श्रीमती टी. आर जयलक्ष्मी पत्नी अर्जदार क्रं-२- श्री. टी. आर राकेश कुमार यांचे वडील ३ श्री. टी. आर आशिशकुमार यांचे वडील कै टी. ई रंगराज यांचा मृत्यू दिनांक ०३/०२ /२०२४ रोजी खारघर येथे अर्जदार कं. १ ते ३ हे यांचे कायदेशीर वारस आहेत.

**मालमत्तेचे वर्णन**

१) बी २०५ ब्लॅकस्मिथकॉर्नर १ प्लॉट नं १ गुरुद्वाराच्या मागे सेक्टर १३ कळंबोली ता. पनवेल रायगड महाराष्ट्र ४१०२१८.

येणे प्रमाणे सदनिका ही मिळकतीचे वर्णन असून सदरहू सदनिकेचे अनुशंगाने वारस दाखला मिळणे करीता अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै टी. ई रंगराज यांचे वारस नाहीत असे अगर यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गहीत धरून मे न्यायालय अर्जदार यांस वारस दाखल प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ८ माहे १२ सन २५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे. श्री इंटरप्राईजेस तर्फे प्रो.प्रा. श्री. सुरजकुमार शर्मा पत्ता: शॉप नं. ४, सिल्वर इस्प्रिंग रेसिडेन्सी, प्लॉट नं. १६५, सेक्टर - २४, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६, यांनी श्री. सुनील कुमार अशोक अमीन पत्ता: शॉप नं. ४, सिल्वर इस्प्रिंग रेसिडेन्सी, प्लॉट नं. १६५, सेक्टर २४, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६, यांचा खालील क्षेत्र ३७० चौ.मी. भुखंडामधील क्षेत्र १८५ चौ.मी. पैकी अविभाज्य भाग (५० टक्के) भुखंड आमचे अशिल यांनी कायमस्वरुपी सिडको त्रिपक्षीय करारान्यये हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविलेले आहे. सदरहू भुखंडाचे वर्णन खालील प्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**
**नोड पुष्पक (वहाळ), ता. पनवेल, जि. रायगड.**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक (वहाळ) | २५ ए | २०६ एफ | क्षेत्र ३७० चौ.मी. भुखंडामधील क्षेत्र १८५ चौ.मी. पैकी अविभाज्य भाग (५० टक्के) भुखंड |

तरी वरिल वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात आम्हांला आमचे खालील पत्यावर समक्ष येऊन भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी नमदु केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्या नंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,
दि.११/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.रेखा कि. होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभात सेंटर, सेक्टर - १ए, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई - ४०० ६१४.**

## जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसद्वारे लोकांना कळविण्यात येते की, मौजे बेलोंडाखार, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत श्री बाळाराम नारायण पाटील व इतर यांच्या मालकीची आहे.

| अ. क्र. | मौजे | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | बेलोंडाखार | ५०/९ | ०-२३-३० पो.ख. ०-०२-७० एकूण ०-२६-०० | ३.४४ |
| २ | बेलोंडाखार | ५८/२१ | ०-०१-३० पो.ख. ०-००-०० एकूण ०-०१-३० | ०.१७ |

वर नमूद मिळकती या सदर मालकांनी विकण्याचे ठरविले असुन सदरची मिळकत आमच्या अशिलांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दान, गहाण, पोटगी, लिजभाडेकरू, हक्क, मालकीहक्क व इतर कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्या सह लेखी हरकत नोंदवाव्यात. वरील मुदती नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकती बाबत खरेदी खताचा लिजचा व्यवहार पुरा केला जाईल याची नोंद घ्यावी.

दि.११/१२/२०२५

**सही/-**
**तृप्ती महेंद्र म्हात्रे**
**ॲडव्होकेट,**
**९, दुसरा मजला, सुयोग सि.एच.एस., सातरहाटी उरण, ता. उरण.**
**फोन नं. ८८७९१४१२३२**

मे.जागुष्टे सो।

ॲड.अभिलाषा म्हात्रे
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.१५१६/२०२५

नि.नं.८/ड

ने.ता.०६/०१/२०२६

कै. कमलाकर दत्तात्रेय म्हात्रे मयतचे वारस
१) श्रीमती. सुमन कमलाकर म्हात्रे
वय - ६७ वर्षे, धंदा-गृहिणी
२) श्री. किरण कमलाकर म्हात्रे
वय- ४८, वर्षे, धंदा- नोकरी,
३) श्री. विरेंद्र कमलाकर म्हात्रे
वय- ४७, वर्षे, धंदा- नोकरी,
रा. विनायकम सोसायटी, प्लॉट नं. ३४/३५/३६,
रूम नं. ३०४, सेक्टर ०५, डी मार्ट जवळ,
नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
४) श्री. शैलेश कमलाकर म्हात्रे
वय- ४३, वर्षे, धंदा- नोकरी,
५) श्री. विशाल कमलाकर म्हात्रे
वय - ३९, वर्षे, धंदा- नोकरी,
६) श्री. मंदार कमलाकर म्हात्रे
वय- ३७, वर्षे, धंदा- नोकरी,
वरील १व २, ४ ते ६ रा.ए टाईप १०/५,
सिडको कॉलनी, शंकर मंदिर जवळ, सेक्टर १३,
नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, कै. कमलाकर दत्तात्रेय म्हात्रे यांचे दिनांक १६/०७/२०२० रोजी ए टाईप १०/५, सिडको कॉलनी, शंकर मंदिर जवळ, सेक्टर १३, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. येथे राहत्या घरी निधन झालेले असून श्रीमती. सुमन कमलाकर म्हात्रे, वगैरे हयांनी, कै. कमलाकर दत्तात्रेय म्हात्रे यांचे वारस असल्याबाबत वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

श्रीमती. सुमन कमलाकर म्हात्रे, वगैरे हे, कै. कमलाकर दत्तात्रेय म्हात्रे यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट श्रीमती. सुमन कमलाकर म्हात्रे, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर, कै. कमलाकर दत्तात्रेय म्हात्रे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे. अरामस स्ट्रक्चर्स एलएलपी तर्फे भागिदार १) श्री. सुधीर मंजीभाई भूषण २) श्री. रोहित महादेव पटेल ३) श्री. हरखचन्द कानजी पटेल ४) श्री. पियुष नानजी वाविया ५) विशाल मंजी पटेल पत्ता: प्लॉट नं. २३, सेक्टर ४०, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६, यांनी श्री. कृष्णा भगवान कोटक राहणार १८-कल्पना, ९६-बी.एन. सुभाष चंद्र रोड, ताराबाल हॉल, मरिन ड्राईव, मुंबई- ४०० ००२, यांच्या मालकीची मिळकत सिडकोने संपादित केलेली असुन सदरहू संपादनापोटी सिडको २२.५ टक्के योजनेअंतर्गत खालील वर्णनाचा भुखंड मिळालेला असुन सदरहू भुखंड आमचे अशिल यांनी कायमस्वरुपी सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविलेले आहे. सदरहू भुखंडाचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**नोड पुष्पक, ता. पनवेल, जि. रायगड.**
**सिडको संचिका क्र. ८०१**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक | २६ | ३६० | २२७० चौ.मी. |

तरी वरिल वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात आम्हांला आमचे खालील पत्यावर समक्ष येऊन भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी नमदु केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्या नंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,
दि.११/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.रेखा कि. होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभात सेंटर, सेक्टर - १ए, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई - ४०० ६१४.**

## अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, पनवेल यांचे न्यायालयात

पत्ता: नवीन प्रशासकिय भवन इमारत, पहिला मजला, दालन क्र. १०२, पनवेल पिनकोड ४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड.

(Tenancy Mannual, Form VIII)
महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ पोटकलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

३२ग दावा क्रमांक: टेनन्सी/एसआर/३१/२०२५

१. श्री. दत्तात्रेय अंबाजी वाकडीकर (मयत) तर्फे वारस,
१.१ श्रीम बामीबाई दत्तात्रेय वाकडीकर
१.२ श्री. रुपेश दत्तात्रेय वाकडीकर
१.३ श्रीम. नीलम दत्तात्रेय वाकडीकर उर्फ निलम राजेश मुंडे
१.४ श्री. जगदीश दत्तात्रेय वाकडीकर
२. श्री. तुळशीराम / तुळशीदास अंबाजी वाकडीकर
३. सौ. सुमन अंबाजी वाकडीकर उर्फ सुमन भगवान भोपी
४. श्री. पप्या उर्फ प्रकाश अंबाजी वाकडीकर
५. सौ. सुषमा अंबाजी वाकडीकर उर्फ दिपाली दिलीप सोनटक्के
वरील सर्व रा. गाव शिरढोण,
ता. पनवेल, जि.रायगड ४१० २२१ — अर्जदार/कुळ

विरुध्द

१. श्रीम.कमळाबाई उर्फ सिताबाई पांडुरंग आपटे
रा. गांव शिरढोण, ता. पनवेल,
जि. रायगड ४१०२०२१ — सामनेवाले / जमिनमालक

जमिनीचे वर्णन

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र. (स.नं./ग.नं.) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | शिरढोण | ७६ | ७ | ला.ला.०-००-८० पो.ख. ०-०१-५० एकूण ०-०२-३० | ०.०३ |

ज्याअर्थी जिल्हा रायगड, तालुका पनवेल, गाव शिरढोण यांतील वर निर्दिष्ट केलेल्या जमिनी...

तुम्ही

अर्जदार यांचे पूर्वज, हे कृषिदिनी कुळ म्हणून करीत असल्याकारणाने, सदर जमिनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ यांच्या ३२ व्या कलमान्वये त्यांनी तुम्ही खरेदी केल्या आहेत असे समजण्यांत येण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी आता तुम्हांस नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत द्यावयाची असल्यास तारीख २३/१२/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता पनवेल येथे शेतजमिन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे तुम्ही हजर रहाणेस कसूर कराल तर त्याबाबतीत तुम्हांस काही ही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यांत येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामात गैरहजेरीत सुरुवात करण्यांत येऊन गुणवत्तेवर निकाल दिला जाईल. तसेच सुनावणीचे तारखेनंतर ही नोटीस प्राप्त झालेस आपण ही नोटीस मिळालेनंतर ८ दिवसाचे आत इकडील कार्यालयात उपस्थित राहून सुनावणीची तारीख समक्ष घेऊन जावी. या अनुषंगाने फेरनोटीस काढली जाणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

ठिकाण :- पनवेल
दिनांक : ११/१२/२०२५

**सही/-**
**अप्पर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल, रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, मिळकत क्र. द्वारका बंगलो, प्लॉट नं. ०४, सेक्टर- १६, फेज २. तळोजा मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०८ सर्वे नं. ११७/१, ११७/२ क्षेत्रफळ २४८ स्के. मीटर ही मिळकत शेख रिजवान अहमद व इमरान अहमद यांच्या मालकीची असून त्यांनी सदर मिळकत ही दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ रोजी विकत घेतली आहे.

तसेच सदर मिळकती संदर्भात डेबटस रिकव्हरी ट्रिब्युनल (DRT) नं. २ कुलाबा, मुंबई कोर्ट येथे केस चालु आहे. रिकव्हरी प्रोसेडिंग नं. टिआरपी १२२/२०२३ असा आहे.

तसेच सदर मिळकत विकत घेतल्या संदर्भात माझ्याकडे सर्व कागदपत्र आहेत. जसे सेल डिड, सातबारा, फेरफार, प्रॉपर्टी टॅक्स इत्यादी. प्लॉट नं. ४ व संपुर्ण एकूण ८८ प्लॉटची अद्याप पर्यंत मोजणी झालेली नाही त्यामुळे आम्ही मोजणीसाठी उपअधीक्षक भूमि अभिलेख, पनवेल यांना अर्ज करणार आहोत.

तरी सदर मिळकत संदर्भात कुणाला काही आक्षेप अथवा माहिती हवी असल्यास त्यांनी शेख रिजवान अहमद व इमरान अहमद यांच्याशी संपर्क साधावा.

पनवेल
दि.११/१२/२०२५

**सही/-**
**शेख रिजवान अहमद व इमरान अहमद**
**मो.नं.९३७२२०२०५२**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, मिळकत क्र. द्वारका बंगलो, प्लॉट नं. ०७, सेक्टर-१६, फेज २, तळोजा मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०८ सर्वे नं. ११७/१, ११७/२ क्षेत्रफळ १७४ चौ. मीटर ही मिळकत सोहेल इत्तेखाब आलम हवलदार यांच्या मालकीची असून त्यांनी सदर मिळकत ही दिनांक १२ एप्रिल २०२४ रोजी विकत घेतली आहे.

तसेच सदर मिळकती संदर्भात डेबटस रिकव्हरी ट्रिब्युनल (DRT) नं २ कुलाबा, मुंबई कोर्ट येथे केस चालु आहे. रिकव्हरी प्रोसेडिंग नं. टिआरपी ११२/२०२३ असा आहे.

तसेच सदर मिळकत विकत घेतल्या संदर्भात माझ्याकडे सर्व कागदपत्र आहेत. जसे सेल डिड, सातबारा, फेरफार, प्रॉपर्टी टॅक्स इत्यादी. प्लॉट नं. ७ व संपुर्ण एकूण ८८ प्लॉटची अद्याप पर्यंत मोजणी झालेली नाही त्यामुळे आम्ही मोजणीसाठी उपअधीक्षक भूमि अभिलेख, पनवेल यांना अर्ज करणार आहोत.

तरी सदर मिळकत संदर्भात कुणाला काही आक्षेप अथवा माहिती हवी असल्यास त्यांनी सोहेल इत्तेखाब आलम हवलदार यांच्याशी संपर्क साधावा.

पनवेल
दि.११/१२/२०२५

**सही/-**
**सोहेल इत्तेकाब आलम हवलदार तर्फे मेहमुद मकबुल हुसेन**
**मो.नं.७७१५९२४२६०**

## अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, पनवेल यांचे न्यायालयात

पत्ता: नवीन प्रशासकिय भवन इमारत, पहिला मजला, दालन क्र. १०२, पनवेल पिनकोड ४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड.

(Tenancy Mannual, Form VIII)
महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ पोटकलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

३२ग दावा क्रमांक: टेनन्सी/एसआर/३२/२०२५

१. श्री. दत्तात्रेय अंबाजी वाकडीकर (मयत) तर्फे वारस,
१.१ श्रीम बामीबाई दत्तात्रेय वाकडीकर
१.२ श्री. रुपेश दत्तात्रेय वाकडीकर
१.३ श्रीम. नीलम दत्तात्रेय वाकडीकर उर्फ निलम राजेश मुंडे
१.४ श्री. जगदीश दत्तात्रेय वाकडीकर
२. श्री. तुळशीराम / तुळशीदास अंबाजी वाकडीकर
३. सौ. सुमन अंबाजी वाकडीकर उर्फ सुमन भगवान भोपी
४. श्री. पप्या उर्फ प्रकाश अंबाजी वाकडीकर
५. सौ. सुषमा अंबाजी वाकडीकर उर्फ दिपाली दिलीप सोनटक्के
वरील सर्व रा. गाव शिरढोण,
ता. पनवेल, जि.रायगड ४१० २२१ — अर्जदार/कुळ

विरुध्द

१. श्री. रामचंद्र भास्कर बहुतुले
२. श्री. प्रसाद भास्कर बहुतुले
३. श्री. शिल्पा सुहास लघाटे
४. श्रीम. सुधा शरद भडकमकर
५. श्री. आनंद भास्कर बहुतुले
रा. गांव शिरढोण, ता. पनवेल,
जि. रायगड ४१०२०२१ — सामनेवाले / जमिनमालक

जमिनीचे वर्णन

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र. (स.नं./ग.नं.) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | शिरढोण | ८८ | १ | ला.ला.०-०२-०० पो.ख. ०-००-५० एकूण ०-०२-५० | ०.०६ |

ज्याअर्थी जिल्हा रायगड, तालुका पनवेल, गाव शिरढोण यांतील वर निर्दिष्ट केलेल्या जमिनी...

तुम्ही

अर्जदार यांचे पूर्वज, हे कृषिदिनी कुळ म्हणून करीत असल्याकारणाने, सदर जमिनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ यांच्या ३२ व्या कलमान्वये त्यांनी तुम्ही खरेदी केल्या आहेत असे समजण्यांत येण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी आता तुम्हांस नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत द्यावयाची असल्यास तारीख २३/१२/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता पनवेल येथे शेतजमिन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे तुम्ही हजर रहाणेस कसूर कराल तर त्याबाबतीत तुम्हांस काही ही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यांत येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामात गैरहजेरीत सुरुवात करण्यांत येऊन गुणवत्तेवर निकाल दिला जाईल. तसेच सुनावणीचे तारखेनंतर ही नोटीस प्राप्त झालेस आपण ही नोटीस मिळालेनंतर ८ दिवसाचे आत इकडील कार्यालयात उपस्थित राहून सुनावणीची तारीख समक्ष घेऊन जावी. या अनुषंगाने फेरनोटीस काढली जाणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

ठिकाण :- पनवेल
दिनांक : ११/१२/२०२५

**सही/-**
**अप्पर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल, रायगड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# अकाऊंट ब्लॉक झाल्याचे सांगत तरुणाच्या खात्यातून २२.८९ लाख केले लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई बँक तसेच गुगल पे अकाऊंट ब्लॉक झाल्याचे सांगत एका सायबर चोरट्याने ऑनलाइन पद्धतीने तळोजा येथे राहणाऱ्या २२ वर्षीय तरुणाकडून तब्बल २२ लाख ८९ हजार रुपये ऑनलाइन उकळल्याची घटना समोर आली आहे. पवन असे या तरुणाचे नाव असून त्याच्या वडिलांनी त्याच्या नावावर बँकेत ठेवलेली फिक्स डिपॉझिटची संपूर्ण रक्कम या सायबर चोरट्याने लाटली. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. तक्रारदार तरुण तळोजा येथे राहतो. गेल्या ऑगस्टमध्ये रविकुमार यादव असे नाव सांगणाऱ्या एका सायबर चोरट्याने या तरुणाशी संपर्क साधून त्याचे बँक अकाऊंट व गुगल पे ब्लॉक झाल्याचे सांगत हे अकाऊंट पुन्हा सुरू करायचे असेल तर ओटीपी पाठवावा लागेल, असे सांगितले. त्यामुळे घाबरलेल्या पवनने त्याच्या मोबाईलवर आलेले सर्व ओटीपी रविकुमार याला पाठवले. या ओटीपींचा गैरवापर करून सायबर चोरट्याने ३९ ऑगस्ट रोजी १८ लाख रुपये आणि १ सप्टेंबर रोजी आणखी ४ लाख ८९ हजार रुपये असे एकूण २२ लाख ८९ हजार रुपयांचा ऑनलाइन व्यवहार करून रक्कम लंपास केली. ही माहिती पवनला समजल्यावर त्याने ती घरच्यांना सांगितली व त्यानंतर त्याने तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी सायबर चोरटा रविकुमार यादव याच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. दरम्यान, सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी त्यांचा ओटीपी कोणालाही देऊ नका, अन्यथा तुमचीही अशा प्रकारे फसवणूक होईल, अशी सूचना पोलिसांनी केली आहे.

# कोकण फेस्टिव्हल- २०२५ चे आयोजन

**दै.रायगड नगरी । संतोष सुतार**

**माणगाव ।** आपल्या कोकणाचे मुख्य प्रवेशद्वार रायगडचे मध्यवर्ती ठिकाण माणगांव येथे शुक्रवार दिनांक १२ ते सोमवार दिनांक २२ डिसेंबर २०२५ पर्यंत विविध खाद्य पदार्थ, विविध खाद्य पदार्थ आणि भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानीचा आनंद माणगांवसह, रायगड, कोकण आणि महाराष्ट्रातील असंख्य प्रेषकांच्या उपस्थित संपन्न होणार आहे.

सदर कार्यक्रमात माणगांव, रायगड, कोकण सह महाराष्ट्रातील विविध श्रेत्रांतील उल्लेखनीय काम करणा-या असामान्य व्यक्तिमत्त्वाचा विशेष सन्मान प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते केला जाणार आहे. लावण्यवती स्वाती पुणेकर यांचा लावणी महोत्सव कार्यक्रम, बॉडी बिल्डींग, रेकॉर्ड डान्स आणि खास कोकण सुंदरी अशा अनेक स्पर्धा तसेच १४ भाषेत आणि ४५०० हुन जास्त विक्रमी प्रयोग केलेला कौटुंबिक विनोदी नाटक ऑल द बेस्ट, तसेच महाराष्ट्राचा सुपरस्टार आणि हास्य टॉनिक भाऊ कदम यांचा सिरीयल किल्लर हा धमाल कौटुंबिक विनोदी नाटकसह अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची अस्सल मेजवाणी खास दर्दी व हौशी रसिक प्रेक्षकांना पाहावयास मिळणार आहे.

## जाहीर नोटीस

**उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**

टेनन्सी अपिल क्र.८७/२०२५

१. श्रीमती, स्नेहल दिपक खाडीलकर
रा. ३६४/४ गुरुदत्त अपार्टमेंट, जैन बस्ती समोर,
गांवभाग, सांगली, महाराष्ट्र ४१६४१६
२. श्रीमती. अनिता युधिष्टिर फडके,
रा. तुराडे, पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड
३. श्रीमती. उषा दिनकर सोहनी
रा. आनंद ओवरी, गणेश मंदिरजवळ,
तुराडे, पो. गुळसुंदे. ता. पनवेल, जि. रायगड
४. श्रीमती. कुमुद दिलीप भट,
रा. तुराडे, पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड
५. श्री. प्रभाकर केशव सोहनी,
रा. डी २१३, मुनोथ रेसिडेंसी, ठाणा नाका,
ता. पनवेल, जि. रायगड
६. श्री. वामन हरी सोहनी,
रा. तुराडे, पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड
७. श्रीमती. वंदना गजानन आठल्ये,
रा. तुराडे, पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड
८. श्रीमती. संध्या विजय पाटणकर उर्फ माधवी माधव पाटणकर,
रा. तुराडे, पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड
९. श्री. विनय दिनकर सोहनी,
रा. तुराडे, पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड
१०. श्री. प्रविण गणेश सोहनी
रा. तुराडे, पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड
११. श्रीमती. प्राची सुधिर करवले,
रा. नाना करवले मार्ग, आंबिवली,
चांभार्ली-मोहोपाडा, ता. खालापूर, जि. रायगड
१२. श्रीमती. वर्षा गणेश सोहनी,
रा. आनंद ओवरी, गणेश मंदिरजवळ,
तुराडे, पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड — वादी
विरुध्द
श्रीमती. राधाबाई पुरुषोत्तम धामणकर
रा. तुराडे, पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड — प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७४ नुसार मौजे तुराडे, ता. पनवेल, जि. रायगड येथिल सर्व्हे नंबर १६/० बाबत अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल यांचेकडील ३२ग दावा क्र. टेनन्सी/एसआर/४५-२०२३ दि. २८/१२/२०२४ रोजीचे आदेशाविरुध्द अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तूतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तूत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दिनांक ०५/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवालेयांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उप विभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे- तुराडे, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.प्र. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १६ | ० | १.०४.७० | २.१२ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०९/१२/२०२५

**सही/-**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

# ग्रामीण परिवर्तनासाठी बहुपक्षीय भागीदारीची दिशा : डॉ. विजय सुर्यवंशी

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

नवोपक्रम, तंत्रज्ञान, उद्योगक्षेत्र आणि समुदाय यांच्या समन्वयातूनच ग्रामीण परिवर्तनाला गती देता येते, असे प्रतिपादन कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी केले.

आयआयटी बॉम्बे येथे नुकतेच स्वदेस फाउंडेशन, आयआयटी बॉम्बेच्या सेंटर फॉर टेक्नॉलॉजी अल्टरनेटिव्हज फॉर रुरल एरियाज आणि ग्रीन एनर्जी अँड सस्टेनेबिलिटी संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'विविध क्षेत्रांच्या भागीदारीद्वारे ग्रामीण परिवर्तन' या विषयावर उच्च-प्रभावी संवाद सत्र पार पडले. महाराष्ट्र शासनाच्या कोकण विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमातून 'विकसित महाराष्ट्र' या शासनाच्या सामायिक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब उमटले.

कार्यक्रमात 'क्रॉस-सेक्टर भागीदारीद्वारे ग्रामीण विकासाला गती' या विषयावर पॅनेल चर्चा घेण्यात आली. चर्चेत डॉ. विजय सुर्यवंशी यांच्यासह प्रा. बकुल राव, रोनीट सेन, डॉ. प्रत्युष पांडा आणि मंगेश वांगे यांनी सहभाग घेतला.

CTARA व GESH येथील प्राध्यापकांनी ग्रामीण भागातील हरित ऊर्जा, नवकल्पना आणि ग्रामीण प्रणालींमध्ये होत असलेल्या तांत्रिक प्रगतीविषयी माहिती सादर केली. त्यानंतर स्वदेस फाउंडेशनतर्फे समुदाय-आधारित परिवर्तनाच्या प्रेरणादायी उदाहरणांचे सादरीकरण करण्यात आले.

या सत्रात डॉ. माणिक दिवे (अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग), विविध उद्योग भागीदार संस्था, स्वदेस फाउंडेशनची टीम, आयआयटी बॉम्बेचे प्राध्यापक तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. उद्योगक्षेत्र, शिक्षणक्षेत्र, धोरणनिर्माते आणि तळागाळातील संस्थांमध्ये फलदायी संवाद घडला.

या संवादातून शासन, उद्योगक्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि समुदाय यांच्यातील सामूहिक कृतीची ताकद अधोरेखित झाली. विस्तारक्षम तंत्रज्ञान, डेटा-आधारित धोरणनिर्मिती, गरजांवर आधारित गुंतवणूक आणि प्रभावी अंमलबजावणी यांच्या साहाय्याने ग्रामीण महाराष्ट्राचा शाश्वत विकास वेगाने साध्य होऊ शकतो, असा संदेश या उपक्रमातून दृढ झाला.

२०४७ आणि त्यापुढील 'विकसित महाराष्ट्र'चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी अशा बहुपक्षीय भागीदारी अनिवार्य असल्याचे मत या कार्यक्रमात नोंदविण्यात आले.



अ‍ॅड.साहिल सं. भुस्कुटे, पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१३७०/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.२०/०१/२०२६

१. श्रीमती. वर्षा विवेक बाजी
वय- ५५ वर्षे, धंदा गृहिणी,
रा. पि.एल - ५ब/६/१, रायन शाळे जवळ,
सेक्टर- १०, नवीन पनवेल, पनवेल,
जि- रायगड- ४१० २०६.
२. मानसी विवेक बाजी
वय - २८ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. घर क्र. ११०३ क, विठ्ठल मंदिर जवळ,चौल
चुनेकोळीवाडा, चौल, अलिबाग, जि- रायगड- ४१० २०६
३. कु. तेजल विवेक बाजी
वय- २५ वर्षे, धंदा शिक्षण,
रा- पि.एल - ५ब/६/१, रायन शाळे जवळ, सेक्टर- १०,
नवीन पनवेल, पनवेल, जि- रायगड- ४१० २०६ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील व अर्जदार क्र १ यांचे पती कै. विवेक तुकाराम बाजी यांचे निधन अपोलो हॉस्पिटल एंटरप्राइज लि., प्लॉट क्रं. १३, सेक्टर- २३, सि. बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ठाणे येथे दिनांक १६/११/२०२४ रोजी झाले आहे. कै. विवेक तुकाराम बाजी यांची आई कै. सुनंदा तुकाराम बाजी यांचे दि. ०६/१२/२००६ रोजी मॉडर्न नर्सिंग होम, अलिबाग येथे देहावसान झालेले आहे. तसेच, कै. विवेक तुकाराम बाजी यांना हिंदु वारसा कायदयानुसार अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.

कै. विवेक तुकाराम बाजी यांच्या नावे असलेल्या स्थावर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

अ. नवीन पनवेल सेक्टर- १० येथील प्लॉट क्र. १०/६ वर स्थीत पी एल-५ब/१, तळ मजला, बिल्डींग क्र. ६, गट क्र. १४४, क्षेत्र- ३०.५० चौ.मी. अशा वर्णनाची सदनिका.

ब. नवीन पनवेल (प) सेक्टर- १४, येथील प्लॉट क. १४/१ वर स्थीत पी एल-५ब/८/१:८, पहिला मजला, बिल्डींग क्र. ८, गट क्र. १०८, १०९, ११४, ११५/१,२, एकूण क्षेत्र ३७.१६ चौ. मी. अशा वर्णनाची सदनिका.

क. कै. विवेक तुकाराम बाजी व सौ. वर्षा विवेक बाजी यांच्या संयुक्त नावे असलेल्या इलियाना २१०१, अरिहंत अस्पायर फेज-१, पलस्पे गाव, मुंबई गोवा रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, अशा वर्णनाची सदनिका.

ड. कै. विवेक तुकाराम बाजी व सौ. कल्याणी गणेश बाजी यांच्या संयुक्त नावे असलेल्या मौजे, रेवदंडा, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग क्र. ४०/१/२/अ/३, क्षेत्र ०-२१-०० हे.आर., एकूण क्षेत्र ०-२२-३० हे.आर., आकार रु. ५.१२ पैसे या बागायत मिळकतीपैकी ०-०६-६० हे.आर. अशा वर्णनाची बागायत मिळकत आहे.

कै. विवेक तुकाराम बाजी यांच्या नावे असलेल्या जंगम मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-

अ. अभ्युदय सहकारी बँक लि. येथील खाते क्र. ०१८०१११०००१०१००, नवीन पनवेल शाखा.

ब. अभ्युदय सहकारी बँक लि. यांनी दि. १५/०७/१९९९ रोजी जारी केलेले दाखला क्र. १४३७३६, भाग क्र. १३८३७९७८ ते १३८३८००२ असे एकूण २५ भाग दाखले.

क. अभ्युदय सहकारी बँक लि. यांनी दि. १२/०५/१९९५ रोजी जारी केलेले दाखला क्र. ११२१३५, भाग क्र. ८६१९५४३ असे एकूण १५० भाग दाखले.

ड. अभ्युदय सहकारी बँक लि. यांनी दि. ०९/०२/१९९५ रोजी जारी केलेले दाखला क्र. ११०१००, भाग क्र. ८१७७८७३ ते ०८१७७८९२ असे एकूण २० भाग दाखले.

वर श्रीमती. वर्षा विवेक बाजी वगैरे हे कै. विवेक तुकाराम बाजी यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्येक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट श्रीमती. वर्षा विवेक बाजी वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. विवेक तुकाराम बाजी यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ०४/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

अ‍ॅड.कल्पेश अनंता कांबळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१६४०/२०२५
ने.ता.०५/०१/२०२६

१. सानिया रिझवान पटेल उर्फ
सानिया ईसा पटेल
वय २० वर्षे, धंदाः- गृहीणी
२. मारिया रिझवान पटेल
वय १८ वर्षे, धंदाः- शिक्षण,
१ व २ राहणार-तळोजा गाव,
तळोजा पाचनंद ता. पनवेल जि. रायगड, — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाला

१. ज्याअर्थी अर्जदार नं. १ व २ यांचे वडील पै. रिझवान अ. रेहमान पटेल हे दि. ११/०९/२०२५ रोजी-घर क्र. १३४ बाग मोहल्ला, तळोजे पाचनंद, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०८. येथे त्यांच्या राहत्या घरी मयत झाले आहेत. पै. रिझवान अ. रेहमान पटेल यांच्या पत्नीचे वडील पै. अब्दुल रहीमान अब्दुल लतीफ पटेल यांचे ताबेकब्जातील व मालकीच्या सामाईक असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजा, पेंधर, रोडपाली, ता. पनवेल, जि. रायगड येथील सामाईक मिळकती**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| पेंधर | ४ | ४५ | ० | ०-१५-० |
| | | ५० | ० | १-१३-० |
| | | ५१ | ० | १-१७-० |
| | | ५२ | ० | ५-०२-८ |
| | | १४५ | २ | ०-२१-४ |
| | | १५२ | ० | ०-३३-१२ |
| पेंधर | ४ अ | ८१ | ० | २-४-९ |
| | | ८७ | ० | ०-६८-५ |
| | | ८८ | ० | ०-२०-४ |
| | | १०२ | ० | ०-८९-८ |
| | | ५७ | ३ | ०-२७-० |
| पेंधर | ४ ब | ८४ | ० | ०-२७-१ |
| | | ९० | ० | ०-४४-३ |
| | | ९३ | ० | १-११-३ |
| | | ५४ | १ | ०-१२-० |
| | | ५५ | ० | ०-१५-४ |
| | | ५६ | ० | ०-१८-५ |
| | | ५७ | १ पै | ०-८५-४ |
| | | ५७ | २ | ०-०२-० |
| पेंधर | ४ क | १०० | ० पै | ०-८६-३ |
| | | १०४ | ० पै | ०-४०-२ |
| | | १०५ | ० | ०-५७-३ |
| | | १०८ | ० पै | ०-०९-९ |
| | | ८९ | ० | ०-५८-० |
| पेंधर | ४ ड | ९१ | ० | १-९९-३ |
| | | ९२ | ० | १-८०-१ |
| तळोजा | ३८ | ७३ | १ | ०-३०-० |
| रोडपाली | ४०/१ | १४४ | १ | ०-३९-१ |
| | ४०/२ | १२१ | ७ | ०-२२-३ |
| | ४०/३ | १२१ | ३ | ०-३६-० |
| | ४०/४ | २०१ | ४ | ०-१७-० |
| | ४०/५ | १२१ | ५ (१) | ०-०८-६ |
| | ४०/६ | १४४ | २ | ०-१६-० |
| | ४०/७ | १२१ | १ | ०-५६-६ |
| | ४०/८ | १६१ | २ | ०-११-०६ |
| | ४०/९ | २०१ | २ | ०-०८-३ |
| | | २०१ | १ | ०-०९-४ |

तसेच वर नमुद केलेल्या मिळकतीबाबत पै रिझवान अ. रेहमान पटेल यांचे वारसदार या नात्याने पै. रिझवान अ. रेहमान पटेल यांचे हिस्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भुखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरीता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि. चौ. अर्ज पनवेल येथील मे. दिवाणी न्या. क. स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे. सदर वर नमुद केलेल्या मिळकतीतील पै. रिझवान अ. रेहमान पटेल यांचे हिस्स्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

आज तारीख ०९/११/२०२५ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

मा.राणे साहेब कोर्ट
अ‍ॅड.शशिकांत काळू म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१५७५/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०१/२०२६

१. श्रीमती. शारदाबाई यशवंत पाटील
वय - ७३ वर्षे, धंदा गृहिणी,
२. श्री. नितीन यशवंत पाटील
वय ३७ वर्षे, धंदा व्यवसाय
अर्जदार १ ते २ रा. घर नं. ८३, नावडे गाव,
दत्तमंदिरा जवळ, ता. पनवेल, जि. रायगड
३. श्री. सत्यकाम यशवंत पाटील
वय ४९ वर्षे, धंदा नोकरी
रा. प्लॅट नं. ४०२, सरस्वती को.ऑ. हौसो.लि.,
प्लॉट नं.१५५, सेक्टर २१, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
४. सौ. स्वाती प्रेमनाथ पाटील
वय ४७ वर्षे, धंदा डॉक्टर
रा. १४७ भूपेंद्र निवास मुंबई नाशिक बायपास हायवे,
शंकर मंदिर, अंजुर दिवे, ता. भिवंडी, जि. ठाणे
५. सौ. मृणालिनी प्रशांत पाटील
वय ४५ वर्षे, धंदा नोकरी
रा. घर नं. १६२, बेलापूर गाव, से. २०,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई, जि.ठाणे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं १ ते ५ यांचे वडील कै. यशवंत नारायण पाटील हे दिनांक २२/०१/२०२३ रोजी मौजे नावडे, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच त्यांची आई कै. भिमाबाई नारायण पाटील ह्या दिनांक २१/०८/२००६ रोजी मौजे नावडे, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै. यशवंत नारायण पाटील यांचे नावे असलेल्या वडीलोपार्जित तसेच ताबेकब्जातील व सामाईक मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन (अ) मौजेः नावडे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे, ता.पनवेल, जि.रायगड | ११३ बी/८४ | १६५ | ० | ०-२९-१२ |
| | | १६६ | ० | ०-११-८ |
| | ४२०/८६ | २०७ | २ | ०-१२-४ |
| | ११३/४९ | ९ | २ | ०-४१-५ |
| | ११३ बी/८४ | ९ | ३ | ०-११-४ |
| | ११३ | २५३ | ० | ०-५-० |
| | ११३ | २५६ | ० | १५-१-८ |
| | ११३ | २३० | ४ | ०-०५-१ |
| | ११३ | २६० | ० | ०-६९-३ |
| | ११३ | ६ | ४ | ०-०६-१ |
| | ११३अे/८३ | ६ | ४ पी | ०-८-० |
| | | २२१ | १ पी | ०-५-८ |
| | ११३अे/८३ | २२३ | ४ | ०-४-० |
| वळवली ता.पनवेल, जि.रायगड | ७६ | १४ | १ | १-६७-४ |
| | | ३० | ४ | ०-१५-० |
| | | ५५ | १ | ०-६५-० |
| | | १०२ | २ | ०-१३-४ |
| | | १०३ | १ | ०-३५-२ |
| | | १०३ | ४ | ०-१४-९ |
| | | ५७ | ४ | ०-४-४ |

**मिळकतीचे वर्णन (ब) मौजे : वळवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| वळवली, ता.पनवेल, जि.रायगड | ७८ | ७ | ०-३०-०० पो.ख. ०-०७-०० एकूण क्षेत्र ०-३७-०० | ०.५६ |
| | ७८ | ३/४/६/९/११/१३/अ | ३-८४-८० पो.ख. ०-५५-३० एकूण क्षेत्र ४-४०-१० | ६.९१ |
| | ७८ | २ | ०-१०-४० पो.ख. ०-००-०० एकूण क्षेत्र ०-१०-४० | ०.२८ |
| | ७८ | १५ | ०-०७-०० पो.ख. ०-०१-०० एकूण क्षेत्र ०-०८-०० | ०.१२ |
| | ७८ | १४ | ०-०९-०० पो.ख. ०-०१-०० एकूण क्षेत्र ०-१०-०० | ०.२२ |
| | ७२ | ७/८/९ | ०-९३-०० पो.ख. ०-१३-०० एकूण क्षेत्र १-०६-०० | १.५४ |
| | ७२ | ५ | ०-०३-०० पो.ख. ०-००-५० एकूण क्षेत्र ०-०३-५० | ०.०६ |
| | ७२ | ४ | ०-१८-२० पो.ख. ०-०१-५० एकूण क्षेत्र ०-१९-७० | ०.४७ |
| | ७२ | १८ | ०-१३-१० पो.ख. ०-०१-३० एकूण क्षेत्र ०-१४-४० | ०.२८ |
| | ७२ | १२ | ०-४६-०० पो.ख. ०-०२-०० एकूण क्षेत्र ०-४८-०० | १.५० |
| | ७२ | १०/१३/१४/१६ | १-९३-२० पो.ख. ०-२७-३० एकूण क्षेत्र २-२०-५० | ४.१० |
| | ७२ | १ | ०-०७-०० पो.ख. ०-००-०० एकूण क्षेत्र ०-०७-०० | ०.२५ |

तसेच वर नमुद केलेल्या मिळकतीबाबत कै. यशवंत नारायण पाटील यांचे वारसदार या नात्याने कै. यशवंत नारायण पाटील यांचे हिस्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भुखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरीता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि. चौ. अर्ज पनवेल येथील मे. दिवाणी न्या. व. स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमुद केलेल्या मिळकतीतील कै. यशवंत नारायण पाटील यांचे हिस्स्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

आज तारीख ०३/१२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्कयानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

जीवनाबंदर जेट्टी बांधणाऱ्या फोरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने...

# श्रीवर्धन नगरपरिषदेचा लाखो रुपयांचा कर बुडवला

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन ।** श्रीवर्धन शहरातील जीवनाबंदर परिसरामध्ये जीवनाबंदर जेट्टीच्या निर्माणाचे बांधकाम सुरू आहे. सदरचा बांधकाम करण्याचा ठेका महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून फॉरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने घेतला आहे. सदर जेट्टीचे बांधकाम दोन ठिकाणी सुरू आहे. जीवनाबंदर व मुळगाव कोळीवाडा या ठिकाणी बांधकामासाठी मोठमोठ्या दगडांची वाहतूक दहा चाकी डंपर मधून केली जात आहे. यासाठी श्रीवर्धन नगर परिषदेच्या रस्त्याचा वापर मागील दोन वर्षांपासून होत असून सदर इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने नगरपरिषदेची कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही.



तसेच कोणताही कर नगर परिषदेला भरलेला नाही. त्यामुळे श्रीवर्धन नगर परिषदेचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. तसेच श्रीवर्धन शहरातील ज्या रस्त्यांवरून अवजड वाहतूक केली जाते, ते रस्ते पूर्णपणे निकामी झाले आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूची पिचिंग पूर्णपणे ढासळली असून अनेक वेळा अनेक ठिकाणी रस्ता खचत आहे. सदर कंपनीकडून खचलेल्या रस्त्याच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात काँक्रीट ओतण्यात येत आहे. तरीही जर एखादा अवजड वाहतूक करणारा भरलेला डंपर रस्ता खचून पलटी झाल्यास मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दगडांच्या होणाऱ्या या क्षमतेपेक्षा अवजड वाहतुकीमुळे श्रीवर्धन शहरातील रस्त्यांची अक्षरशः दुर्दशा झाली आहे. तसेच प्रादेशिक परिवहन विभाग पेण यांच्याकडून देखील या क्षमतेपेक्षा जास्त अवजड वाहतुकीवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नाही.

रस्त्याची क्षमता दहा ते पंधरा टन इतके वजन वाहून नेण्याची असताना त्यावरून ३२ ते ३५ टन दगडांचे भरलेले डंपर वाहतूक करण्यात येत आहेत. अनेक वेळा या डंपर चालकांकडून अनेक छोटे मोठे अपघात देखील घडत असतात. यावरून श्रीवर्धन शहरातील काही नागरिक व डंपर चालक यांच्यामध्ये वादावादी होण्याचे प्रकार घडतात.

त्यांच्यावर देखील सदर फोरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीकडून जबरदस्ती गुन्हे दाखल करण्याचा प्रकार सुरू आहे. एक तर श्रीवर्धन नगर परिषदेला एक रुपयाचा कर न भरता शहरातील रस्त्यांची वाट लावणाऱ्या कंपनीने आपला मुजोरपणा असाच चालू ठेवला तर श्रीवर्धन शहरातून मोठ्या प्रमाणावर कंपनी विरोधात जनआंदोलन उभे राहील. सदर इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने श्रीवर्धन शहरातील रस्ते देखील तातडीने दुरुस्त करून देण्याची आवश्यकता आहे. कंपनीला कामाचा ठेका देणाऱ्या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने देखील श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर पाण्याची पातळी वाढत असल्याने होणाऱ्या दुष्परिणामांची तज्ञांकडून पाहणी करून योग्य तो निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे. नाहीतर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाला तसेच फोरकोन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला जनतेच्या प्रक्षोभाला सामोरे जावे लागेल. असे जाणकारांमधून बोलले जात आहे.

# बालपणीच्या सहा मित्रांची जमीन व्यवहारात केली १०.४० कोटींची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबईतील अंधेरी भागात राहणाऱ्या एका व्यावसायिकाने त्याच्या बालपणीच्या सहा मित्रांची जमीन व्यवहारात फसवणूक करून तब्बल १० कोटी ४० लाख रुपये लाटल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. रविशंकर कृष्णरायाज पसुपुलेटी असे त्याचे नाव असून, पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपासाला सुरुवात केली आहे.

तक्रारदार ए. रामकृष्णा (५७) हे आंध्र प्रदेश येथे राहत असून, २०१३ मध्ये ते व त्यांचे इतर सहा मित्र मुंबईत आले होते. त्या वेळी मुंबईत राहणारा त्यांचा बालपणीचा मित्र रविशंकर याने पनवेल तालुक्यातील तुरमाळे गावातील जमीन भविष्यात खूप महत्त्वाची ठरणार असल्याचे सांगून ही जमीन खरेदी करण्यास मित्रांना सुचवले होते.

त्यानुसार रामकृष्णा व त्यांच्या मित्रांनी मिळून तुरमाळे गावातील १८ गुंठे जमीन रविशंकर पसुपुलेटी याच्या माध्यमातून खरेदी करण्याचे ठरवले व जमीन खरेदीसाठी सर्वांनी मिळून ८५ लाख रुपये रविशंकर याला दिले होते. त्यानुसार २०१९ मध्ये या जमिनीचे खरेदीखत रामकृष्णा यांच्या नावावर करण्यात आले. त्यानंतर रविशंकरने सातबारा नोंदणी लवकरच करून देण्याचे आश्वासन दिले, मात्र त्यानंतर तो टाळाटाळ करू लागला.

वारंवार पाठपुरावा करूनही रविशंकर याने सातबारा त्यांच्या नावावर नोंदणी करून न दिल्याने रामकृष्णा व त्यांच्या मित्रांनी कायदेशीर सर्च रिपोर्ट काढला असता, त्यात्त रविशंकर याने १८ जानेवारी २०२४ रोजी ही जमीन में क्रेस्ट रिसॉर्ट अँड स्पा प्रा. लि. यांना तब्बल १० कोटी ३० लाख रुपयांना परस्पर विक्री केल्याचे उघडकीस आले. या जमिनीचा व्यवहार देवाशिष चक्रवर्ती व आशिष गाडगीळ यांच्या नावे नोंद असून, रविशंकर याने या व्यवहाराबाबत रामकृष्णा व त्यांच्या मित्रांना कोणतीही माहिती न देता ही जमीन विक्री व्यवहार करून १० कोटी ३० लाख रुपयांचा व्यवहार करून मूळ भागीदारांना त्यांचा हिस्सा न देता सर्व रक्कम हडपल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यावर रामकृष्णा व त्याच्या मित्रांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेत या प्रकरणी रविशंकरविरोधात तक्रार दाखल केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# महिलांविरोधातील अत्याचारा विरोधात ऑरेंज द वर्ल्ड कॅम्पेन पनवेलमध्ये संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महिलांच्या विरोधात होत असलेल्या हिंसाचाराच्या विरोधात इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी, विर वुमेन्स फाऊंडेशन व रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटी या तिन सामाजिक संस्थानी एकत्र येऊन पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मदतीने ऑरेंज द वर्ल्ड या जनजागृती रॅलीचे आयोजन केले होते .

महिलांच्या सुरक्षेच्या बाबतीत जनजागृती निर्माण करण्याच्या विषया बाबतीत नितीन ठाकरे यांनी दाखवलेली उत्फुर्तता व मदत निश्चितच वाखाणण्यासारखी होती . त्याचप्रमाणे पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील वं त्यांच्या सहकाऱ्यांचेही सहकार्य क्लबला ही रॅली उत्तमरीत्या पार पाडण्यास कामी आले . इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी ही महिलां मार्फत चालवली जाणारी सामाजिक संस्था आहे इथे वेगवेगळ्या स्तरातील महिला एकत्र येऊन विविध प्रकारचे समाजकार्य तसेच जनजागृती पर उपक्रम राबविले जातात . या वर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावर या क्लबने ऑरेंज द वर्ल्ड या थीम अंतर्गत सर्व क्लबना महिलांच्या विरोधात होत असलेल्या अन्यायाविरोधात आपापल्या क्लबमध्ये वेगवेगळ्या माध्यमांतून जनजागृती करण्याचे आवाहन केले होते . या आंतरराष्ट्रीय उपक्रमाचा एक भाग म्हणून तसेच महिलां विषयी बांधीलकी जपण्यासाठी इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीने या रॅलीचे आयोजन केले होते . वडाळे तलाव येथुन त्याचा श्रीगणेशा करण्यात आला.

रॅलीमध्ये पनवेल पोलीस आपापल्या बाईकवरून रॅलीच्या अग्रस्थानी व अन्य सर्व सदस्य शिस्तीत त्यांच्या मागोमाग यापद्धतीने रॅली प्रामुख्याने पनवेल येथील वडाळे तलाव येथुन सुरु होऊन क्रमशः जेष्ठ नागरिक हॉल , म्युनिसिपल कॉरपोरेशन, जय भारत नाका, शिवाजीपुतळा, आंबेडकर पुतळा व नंतर ब्रीजखालून पनवेलबस स्टॅंडच्या रोडने पुन्हा वडाळे तलावावर येऊन रॅलीची सांगता करण्यात आली. नंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका झांजुर्णे यांनी माहिलांना संकटाच्या वेळी बचावासाठी स्वतःला कशा प्रकारे तयार करावे व स्वत: च्या सुरक्षेची काळजी कशी घ्यावी यावर उत्तम मार्गदर्शन केले . तसेच पनवेल वाहतूक पोलीस यावेळी सर्व महिलांनी अतिशय शिस्तबद्धतेचे प्रदर्शन करत कुठल्याही प्रकारची नारेबाजी न करता केवळ गाडीवर लावलेल्या बॅनरच्या माध्यमातून आपला संदेश लोकांपर्यंत पोचवण्याच्या उत्कृष्ट प्रयत्न केला. यावेळी उपस्थित सर्व महिलांनी थीम फॉलो करण्यासाठी घातलेल्या ऑरेंज ड्रेस कोडने जनतेचे लक्ष वेधून घेतले. यावेळी अर्चना ठाकुर तसेच क्लबच्या प्रेसिडेंट सिंपल आंचलिया, सेक्रेटरी युक्ती शाह, पीपी ध्वनी तन्ना, आयपीपी प्रतिभा डांगी, खजिनदार ममता ठक्कर, एडीटर मौसमी गोगुला, जॉईट सेक्रेटरी वैशाली कटारिया, सीसी प्रिया चतुर्वेदी मेंबर, नम्रता बांठीया, शिला शाह, डॉ.भावना मुरुडकर, किर्ती मुनोत, दुर्गा चौधरी, तसेच वीर वुमेन्स ग्रुपच्या सदस्या पुनम जैन, श्रुती निस्सर, सीमा जैन व रोटरी क्लबचे हर्मेश तन्ना, रोहित जाधव, दिप्ती जाधव उपस्थित होते

# बिबट्याचा शोध घेण्यासाठी वनविभाग सरसावले, रात्रीची गस्त आणि नागरीकांमध्ये जनजागृती

**दै.रायगड नगरी । उरण**

उरणच्या पुर्व भागातील पुनाड, कोप्रोली परिसरात बिबट्याचा संचार असून कोप्रोली गावातील एका शेतकऱ्याच्या दोन बकऱ्या मारल्या असल्याची बाब समोर आली आहे. या बकऱ्यांचा अर्धवट खाल्लेला मृतदेह जंगलात आढळून आल्याने बिबट्याच्या असण्याच्या शक्यतेवर शिक्का मोर्तब झाले आहे. या परिसरात आणखी काही प्राण्याचे मृतदेह सापडले आहेत. बुधवारी घडलेल्या या प्रकारानंतर वनविभागाने तातडीने या जंगलात गस्त सूरू केली असून बिबट्याचा शोध घेण्यात येत आहे.

वन विभागाने सर्च ऑपरेशन केल्यानंतर येथे बिबट्याची विष्ठा सापडली असून त्यात प्राण्यांच्या केसांचे अवशेष सापडले असल्याचे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. बिबट्याचा आणि मानवाचा संघर्ष होवू नये म्हणून वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी पुनाडे, रानसई येथिल वाड्यांवरील नागरीकांना बिबट्यापासून कसे संरक्षण करायचे आणि कोणती खबरदारी घ्यावी याबाबत गुरूवारी रात्री मार्गदर्शन केले.तसेच कोप्रोली ग्रामपंचायतीच्या वतीने खबरदारी घेण्यासाठी पोस्टर बाजी करण्यात आली आहे.

एन.डी. कोकरे (परिक्षेत्र वन अधिकारी, उरण)- उरण पुर्व भागातील कोप्रोली-पुनाडे येथिल जंगलात बिबट्या असल्याचे पुरावे सापडले आहेत. या ठिकाणी मोठे जंगल असल्यामुळे त्याचा शोध घेणे कठीण जात आहे. बिबट्या अर्धवट टाकलेले खाद्य खाण्यासाठी पुन्हा या ठिकाणी येण्याची शक्यता आहे. आम्हा या ठिकाणी सीसी टीव्ही आणि पिंजरे लावण्याच्या प्रयत्नात आहोत. कर्नाळा अभयारण्य जवळच असल्याने तेथून हा बिबट्या या परिसरात आला असण्याची शक्यता आहे.



# अक्षयानंद चॅरिटेबल ट्रस्ट आणि प्रगती फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत वैद्यकीय शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

अक्षयानंद चॅरिटेबल ट्रस्ट आणि प्रगती फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्री स्वामी समर्थ मठ, जुईनगर, नवी मुंबई येथे आयोजित मोफत वैद्यकीय शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



या शिबिरात अक्षयानंद चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार तसेच औषधांचे विनामूल्य वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा लाभ २५० हून अधिक नागरिकांनी घेतला. शिबिरात उपस्थित डॉक्टरांबरोबरच वैद्यकीय स्वयंसेवकांनी नागरिकांना आवश्यक ते आरोग्य मार्गदर्शनही दिले. सामाजिक आरोग्यजागृती वाढविण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाचे स्थानिक नागरिकांनी मनापासून स्वागत केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी अक्षयानंद चॅरिटेबल ट्रस्टचे मॅनेजिंग ट्रस्टी डॉ. अक्षय सूर्यवंशी, डॉ. आदित्य तोंडुलकर , डॉ. मोनिका देसाई, डॉ. प्रीती गावकर, सौ सायली सूर्यवंशी श्री. अखिलेश सूर्यवंशी, श्री. प्रतीक कांबळे तसेच ट्रस्टचा नर्सिंग स्टाफ यांचे विशेष सहकार्य लाभले

# शेख हुसेन काझी इंग्लिश हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा शाळा गुणवत्ता मूल्यांकन समितीचा दौरा संपन्न

**दै.रायगड नगरी । निलेश लोखंडे**

**महाड ।** शेख हुसेन काझी इंग्लिश हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे शाळा गुणवत्ता मूल्यांकन समितीची औपचारिक भेट पार पडली. सुधीर भास्कर सकपाळ, विस्तार अधिकारी (शिक्षण) व पथक प्रमुख यांच्या नेतृत्वाखालील चार सदस्यीय समितीत वैभव बबन कांबळे (केंद्र प्रमुख), रघुनाथ रामदास वन्नेरे (मुख्याध्यापक) आणि शिवाजी अर्जुन यादव (तंत्रस्नेही शिक्षक) यांचा समावेश होता.

समितीने शाळेच्या पायाभूत सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता, अध्यापन पद्धती, शिस्त, उपक्रमशीलता आदी सर्व घटकांचे सखोल निरीक्षण केले. प्रत्येक वर्गात प्रत्यक्ष भेट देत पाठ निरीक्षण करण्यात आले तसेच १२८ मानकांनुसार सादर केलेल्या पुराव्यांची तपासणी करण्यात आली.

समितीने शाळेचे प्रशासन, व्यवस्थापन आणि शैक्षणिक कामकाज समाधानकारक आणि उत्तम असल्याचे नमूद केले. सुधीर सकपाळ यांच्या अध्यक्षतेखाली समितीने संस्थेचे अध्यक्ष वजीर कोंडीवकर, सचिव असफ पल्लवकर, मुख्याध्यापक संभाजीराव सूर्यवंशी, मुख्याध्यापिका वर्षा मालुसरे आणि सर्व शिक्षक-कर्मचारी यांच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शाळा व्यवस्थापन आणि स्टाफच्या संयुक्त प्रयत्नांमुळे शैक्षणिक गुणवत्तेत सातत्याने होत असलेली प्रगती अधोरेखित झाल्याचे समितीने विशेषत्वाने नमूद केले.



# माणगावच्या अन्विता बुटे हिची जागतिक कर्तबगारी

## गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नावाची अधिकृत नोंद

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगावच्या भूमीने पुन्हा एकदा कर्तृत्वाचा अनमोल ठेवा जगासमोर उघड केला आहे. शहरा-तील अतिशय मेहनती, जिद्दी आणि प्रतिभावान रोलर स्केटिंगपटू कुमारी अन्विता संजना संजय बुटे हिने केलेली कामगिरी केवळ महाराष्ट्राचा नव्हे, तर संपूर्ण देशाचा अभिमान वाढवणारी ठरली आहे. कर्नाटकातील बेळगाव येथे २४ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या शिवगंगा रोलर स्केटिंग स्पर्धेत अन्विताने १०० मीटर अंतर केवळ २२.२२ सेकंदांमध्ये पूर्ण करून वेधक कामगिरी केली. या अद्वितीय कौशल्याची अधिकृत दखल घेत गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सने तिचे नाव जागतिक विक्रमधारक म्हणून नोंदवले आहे. एका साध्या वा-तावरणातून आलेल्या मुलीने केलेली ही कर्तबगारी संपूर्ण माणगावची मान वाढवणारी ठरली आहे.



# बेकायदेशीर विद्यार्थी वाहतूक संदर्भात १ ते ३१ जानेवारी दरम्यान राज्यव्यापी विशेष मोहीम राबविणार

**नागपूर । वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये बेकायदेशीर विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांसंदर्भात विशेष मोहिम राबवली जाणार आहे. मुंबईसह राज्यभरात हा उपक्रम १ ते ३१ जानेवारीदरम्यान राबविण्यात येणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

विधानसभा सदस्य डॉ.नितीन राऊत यांनी लक्ष-वेधी सुचनेद्वारे नागपूरमधील २०२१ मध्ये झालेल्या स्कूल व्हॅन अपघाताच्या पार्श्वभूमीवर प्रश्न उपस्थित केला, त्यावेळी ते उत्तरादाखल बोलत होते. परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, संबंधित पुलावर काम सुरू असल्याने अरुंद रस्त्यावरून दोन वाहनांची टक्कर होऊन चालक आणि १३ वर्षांच्या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीत बेकायदेशीरपणे विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या २४८ वाहनांवर कारवाई करून ८० लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, फिटनेस प्रमाणपत्र नसलेली कोणतीही स्कूल बस किंवा व्हॅन रस्त्यावर आढळली तर त्यांना थेट जॅमर लावून बंद केले जाईल. त्याचप्रमाणे आता कुठलीही गाडी फिटनेसशिवाय रस्त्यावर येऊ नये. यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करून असे वाहन रस्त्यावर येण्यापूर्वीच रोखण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असून १३+१ स्वरूपाची सुरक्षित स्कूल व्हॅन मॉडेल लागू केले आहे. या व्हॅनमध्ये सर्व बाजूंनी जाळ्या बसविण्यात आल्या असून यात सीसीटीव्ही, जीपीएस अशा सुरक्षितता सुविधा यंत्रणा आहे. त्याचबरोबर अनेक शाळांनी जुन्या बस रद्द करून नव्या सुरक्षित व्हॅन घेण्यास सुरुवात केली आहे.

राज्यातील आयटीएमएस प्रणाली, सीसीटीव्ही नेटवर्क तसेच त्रिमितीय घाटनकाशा तयार करण्याचे काम सुरू असल्याचे परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगून बेकायदेशीर युटर्न, लेन बदल, ओव्हरलोडिंग यांसारख्या नियमभंगांवर स्वयंचलित दंडात्मक कारवाई करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान वापरले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.